## मानक २०

**१.५.१ शाळा काळजी, करूणा आणि आदरार्थी वातावरणात मूल्ये वृद्धिगत करते. विविधतेचे स्वागत करते आणि सर्व शालेय भागधारकांत सांस्कृतिक मूल्यांची रुजवणूक करते.**

## निवडलेला स्तर : ४

**१.१ मूल्य शिक्षणाचा समावेश असलेला अभ्यासक्रम आराखडा SCERT तयार केलेला उपलब्ध असून शिक्षक तो वापरतात.**

मूल्य शिक्षण एक महत्त्वपूर्ण घटक आहे जो विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. SCERT ने मूल्य शिक्षणचा समावेश असलेला अभ्यासक्रम आराखडा तयार केला आहे, जो आमच्या कनिष्ठ महाविद्यालयात वापरला जातो.

**१.२ अध्ययन अध्यापन प्रक्रियेत मूल्यांचा अंतर्भाव केला जातो.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयात अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेत मूल्यांचा अंतर्भाव केल्या जातो.

सर्व विद्यार्थ्यांना समान संधी देऊन, त्यांचा न्यायपूर्णपणे विकास केला जातो. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आदर देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना निर्माण करणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना इतरांच्या भावनांचा आदर करण्याची शिकवण दिली जाते तसेच विद्यार्थ्यांना सत्य बोलण्याची, प्रामाणिक आणि नीतिमान राहण्याची शिकवण दिली जाते.

**१.३ शाळा संबंधित मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी उपक्रमाची आखणी करते.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयात संबंधित मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी काही सामाजिक कार्य उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना समाजसेवा कार्यात सहभागी करुण घेतल्या जाते, जसे की वृद्धाश्रम, स्वच्छता मोहिम इत्यादी तसेच संस्कृती आणि विविधतेचे स्वागत करणारे कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना माहिती देणे, विविधतेचा आदर करण्याचे महत्त्व शिकवणे, संस्कृती महोत्सव, आंतरराष्ट्रीय दिवस साजरे केले जाते.

**२.१ एकात्मिक अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मूल्य प्रदर्शित केली जातात**

एकात्मिक अभ्यासक्रमाच्या माध्यमातून तसेच भित्ती पत्रकाच्या माध्यमातून इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारी तसेच पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्त्व शिकवले जाते आणि त्यांच बरोबर त्यांचा मानसिक, आणि नैतिक विकासा हि केला जातो.

**२.२ शाळा समाजातील अनादर, असमानता आणि भेदभाव कमी करून आपसात समभाव प्रस्थापित करते.**

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना समाजातील अनादर, असमानता आणि भेदभाव कमी करून आपसात समभाव प्रस्थापित करण्यासाठी महाविद्यालयात वेगवेगळे उपक्रम राबविल्या जातात जसे चर्चा सत्र, टीम वर्क, स्नेहमेळावे, वर्धापनदिन कार्यक्रम इत्यादी.

**३.१ पारंपारिक भारतीय मूल्ये (ज्येष्ठांचा, पर्यावरणाचा, अन्न, प्राणी, वनस्पती) इत्यादींचा आदर करणेबाबत शाळा विद्यार्थ्यांना मदत करते.**

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पारंपारिक भारतीय मूल्ये शिकवण्यासाठी विद्यार्थ्यांना सन्मान व आदराची शिस्त शिकवली जाते तसेच पर्यावरणासाठी वृक्षारोपण अभियान आणि स्वच्छतेची मोहीम तसेच वनस्पती आणि प्राण्यांची काळजी घेणे उद्यान किंवा बागकामाच्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना वृक्षारोपण आणि शारीरिक स्वच्छतेचे महत्त्व शिकवले जाते.

**३.२ शाळा विविध पार्श्वभूमी आणि दृष्टिकोनाची विद्यार्थी आणि शिक्षकांचे स्वागत करते आणि त्या अनुषंगाने विशेष कार्यक्रम/ प्रसंग साजरे करते.**

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध पार्श्वभूमी आणि दृष्टिकोनाच्या माध्यमातून विद्यार्थी आणि शिक्षकांचे स्वागत करते आणि त्या अनुषंगाने विशेष कार्यक्रम/ प्रसंग साजरे केल्या जाते जसे की, सांस्कृतिक महोत्सव यांमध्ये विद्यार्थी विविध धर्मांच्या प्रथा आणि परंपरांविषयी शिकू शकतात, त्याचप्रकारे आंतरराष्ट्रीय दिन यासारखे कार्यक्रम साजरे केल्या जाते.एकत्रित संवाद साधण्यासाठी भाषा महोत्सव तसेच विशेष कार्यक्रम आणि प्रसंगांचे आयोजन करून संविधान दिवस, आंतरराष्ट्रीय शांती दिवस, आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिवस कार्यक्रम साजरे केल्या जाते.

**४.१ शालेय धोरण अभ्यासक्रम, वर्तणूक आणि शाळेतील नातेसंबंध हे सर्व समावेशक, नैतिक आणि आदरपूर्ण असून प्रभावीपणे अमलात आणले जातात आणि त्यांचे नियमितपणे पुनरावलोकन केले जाते.**

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये कोणतीही भेदभावाची भूमिका न ठेवता, विविध पार्श्वभूमी, धर्म, जात, आणि संस्कृतीच्या विद्यार्थ्यांना समान वागणूक दिली जाते.

**४.२ सर्व भागधारकाद्वारे माहितीच्या आधारे व एकमेकांच्या सहकार्याने घेतले गेलेले निर्णय विद्यार्थ्यांच्या हितासाठी असतात व ते नैतिकता समानता आणि प्रतिष्ठेची संहिता प्रतिबिंबित करतात.**

कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शालेय धोरण आणि निर्णय प्रक्रियेत सर्व भागधारकांचे (विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळेचे व्यवस्थापन, कर्मचारी इत्यादी) सहकार्य आणि माहितीचे आदान-प्रदान केल्या जाते.तसेच विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतलेले निर्णय नैतिकतेच्या आणि समानतेच्या मूल्यांचा आदर करून महाविद्यालयातील सर्व निर्णय हे विद्यार्थ्यांना समान संधी आणि उपचार देण्यावर आधारित आहे.

**४.३ विद्यार्थी अध्ययन निष्पत्ती साध्यता व शालेय नोंदी, विद्यार्थी संचयी नोंदपत्रक, दैनंदिन निरीक्षण आणि परस्पर आंतरक्रिया यामधून प्रतिबिंबित होतात.**

विद्यार्थ्यांची अध्यान निष्पत्ती (academic performance), शालेय नोंदी, विद्यार्थी संचयी नोंदपत्रक, दैनंदिन निरीक्षण, आणि परस्पर आंतरक्रिया हे सर्व महाविद्यालयातील व्यवस्थेत विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे आणि महाविद्यालयातील कार्यप्रदर्शनाचे महत्त्वपूर्ण मापदंड आहेत. या सर्व घटकांमधून विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, वर्तमानातील स्थिती आणि सुधारणा यांचा योग्यपणे आढावा घेतला जातो.







**अध्ययन अध्यापन** **भित्ती पत्रक**







सांस्कृतिक महोत्सव वृद्धाश्रम भेट

स्वच्छता मोहीम








# इंदिरा महाविद्यालयात वृक्षारोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कळंब** : स्थानिक इंदिरा महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागामार्फत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये विविध प्रकारची फळे आणि फुले देणारी झाडे लावण्यात आली.

या वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य एस. वाय. लखदिवे होत्या. त्यांनी वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम कमी करण्यासाठी वृक्षारोपण करणे गरजेचे आहे असल्याचे मत यावेळी व्यक्त केले.

निसर्गाच्या असमतोलाने काही ठिकाणी अतिवृष्टी पाहायला मिळत आहे, तर काही ठिकाणी पाऊसच पडत नसल्याचे चित्र देशभरात आहे. यासाठी वृक्षारोपण अत्यावश्यक बाब आहे. काळाची गरज लक्षात घेता प्रत्येकाने वृक्षारोपण करणे गरजेचे आहे, असे मत यावेळी नोंदविण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. दशरथ चव्हाण व विभागातील डॉ. सुरज देशमुख, डॉ. प्राची बोंडे, प्रा. स्नेहल खांडेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य एस. वाय. लखदिवे, डॉ. माधुरी राखुंडे, डॉ. पांडुरंग इंगळे, डॉ. शरयू बोंडे, प्रा. राम भुरके, प्रा. जाधव शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.




संविधान दिन



पालक सभा

Principal
Indira Mahavidyalay,Kalamb
Dist.Yavatmal